**डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेतंर्गत**
**अनुदान वितरण. सन २०१७-१८**

**महाराष्ट्र शासन**
**अल्पसंख्याक विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः अविवि-२०१७/प्र.क्र.१४५/का-६**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
तारीख: २७ मार्च, २०१८

<u>वाचा :</u>

१) शासन निर्णय क्रमांकः अविवि-२०१०/प्र.क्र.१५२/१०/का-६, दि.११.१०.२०१३
२) शासन निर्णय क्रमांक: अविवि-२०१७/प्र.क्र.१४५/का-६, दिनांक १६ मार्च, २०१८
३) जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांचे पत्र क्र. कक्ष-८/अल्पसं/क.लि./कावि-१६५/२०१८, दि. २०.०३.२०१८
४) जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांचे पत्र क्र. जा.क्र.२०१८/साशा/अल्पसंख्यांक/कावि, दिनांक ९.२.२०१८

<u>प्रस्तावना -</u>

मदरशांमध्ये शिकत असलेल्या विविध वयोगटातील विद्यार्थ्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पारंपारिक धार्मिक शिक्षणाबरोबरच विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, मराठी, इंग्रजी व उर्दु या विषयांचे शिक्षण देणे, मुख्य प्रवाहातील शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या इ. ९ वी, १० वी, ११वी व १२ वी तील तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती देणे, परिणामी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेमध्ये वाढ होऊन त्यांची रोजगार क्षमता वाढून आर्थिक दर्जा सुधारण्यास मदत होईल यादृष्टिने मदरशांच्या आधुनिकीकरणासाठी पायाभूत सुविधा, ग्रंथालयासाठी अनुदान देणे व शिक्षकांना मानधनासाठी अनुदान देण्याची डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना राबविण्यास शासन निर्णय क्रमांक : अविवि - २०१०/ प्र.क्र.१५२/१०/का-६, दि. ११ ऑक्टोबर २०१३ अन्वये मंजूरी देण्यात आली आहे. या योजनेसाठी होणारा खर्च, २२३५ मुख्य लेखाशीर्ष, १- मागणी क्रमांक झेडई "सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२ समाजकल्याण, २०० इतर कार्यक्रम (०१) (३१) राज्य योजनांतर्गत योजना, राज्यातील नोंदणीकृत मदरसांना पायाभूत सुविधा आणि विषय शिक्षकांच्या वेतनाकरिता सहायक अनुदान (२२३५बी२२७) ३१ सहायक अनुदान" या लेखाशिर्षाखाली करण्यात येतो. सदर लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ करीता ०८.०० कोटी इतकी तरतूद मंजूर करण्यात आली आहे. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक-अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक ६ फेब्रुवारी, २०१८ अन्वये आर्थिक वर्षाच्या अखेर पर्यंत खर्चासाठी योजनातर्गत अर्थसंकल्पित निधी एकूण वार्षीक तरतुदीच्या ८०% म्हणजे रू. ६.४० कोटी इतका निधी उपलब्ध आहे. सदर योजनेंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात शासन निर्णय समक्रमांक दिनांक १६ मार्च, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये रू. ३,९०,८४,५३८/- वितरीत केल्यानंतर रू. २,४९,१५,४६२/- इतकी तरतूद शिल्लक असून त्यातून काही मदरसांना अनुदान वाटप करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय:-**

१. राज्यातील नोंदणीकृत मदरशांच्या आधुनिकीकरणासाठी डॉ.झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना दि.११.१०.२०१३ च्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यानुसार सदर योजनेंतर्गत पात्र मदरसांची शासनास अनुदानासाठी शिफारस करण्यासाठी संबंधीत जिल्हयांचे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात करण्यात आली आहे. सन २०१७-१८ या वर्षाकरीता जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिकारात अनुदानासाठी पात्र ठरविलेल्या मदरसांची संख्या आणि त्यांना त्यासाठी आवश्यक असलेल्या अनुदानाची आवश्यकता यांचा जिल्हानिहाय तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

**जिल्हानिहाय मदरशांची संख्या व अनुदान .**

| अ.क्र | जिल्हा | मदरसा संख्या | मंजूर अनुदान (रुपये) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | अमरावती | १३ | ५६,४०,००० |
| २. | जालना | ०१ | ४,७०,००० |
| | एकुण | १४ | ६१,१०,०००/- |

२. उपरोक्तप्रमाणे मंजूर मदरशांची नांवे व त्यांस मंजूर अनुदान यांचा तपशील दर्शविणारे सहपत्र या शासन निर्णयासोबत जोडण्यात आले आहे. त्यानुसार एकूण **१४** मदरशांना एकूण **रु. ६१,१०,०००/- (रुपये एकसष्ट लाख दहा हजार फक्त )** इतके अनुदान मंजूर करण्यात येत आहे. या शासन निर्णयासोबतच्या सहपत्रात दर्शविण्यात आलेल्या जिल्हयांच्या समोर नमूद करण्यात आलेले अनुदान संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडे सूपूर्द करण्यात येत आहे. संबंधित जिल्हाधिकारी, यांनी यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या निधीच्या मर्यादेत अनुदानाचे अर्थसंकल्प वितरण प्रणालीतून (BDS) आहरण व संवितरण करण्यास या शासन निर्णयाद्वारे मंजूरी देण्यात येत आहे. याकरिता संबंधित जिल्हाधिकारी, हे नियंत्रक अधिकारी अणि आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम पाहतील. संबंधित जिल्हाधिकारी यांनी अथवा या कामासाठी त्यांनी प्राधिकृत केलेले त्याच्या कार्यालयातील अधिकारी यांनी सोबत जोडलेल्या सहपत्रा प्रमाणे शासन स्तरावर मान्य करण्यात आलेली रक्कम संबंधित मदरशांच्या राष्ट्रीयकृत बँकेतील खात्यामध्ये ई.सी.एस. द्वारे जमा करावी, उर्वरित रक्कम शासकीय कोषागारात जमा करावी.

३. या योजनेंतर्गत मदरशांना चालू वर्षात ज्या विनिर्दिष्ट प्रयोजनासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे, त्याच प्रयोजनासाठी संबंधित मदरशांनी निधी खर्ची टाकावा.

४. मदरशांना अनुदान वितरित करण्यात आल्यानंतर संबंधित मदरशांनी अनुदान प्रत्यक्ष प्राप्त झाल्यापासून तीन महिन्यांच्या कालावधीत प्रस्तावात नमूद केलेली कामे पूर्ण करणे आवश्यक आहे व त्यानंतर अनुदानाच्या विनियोगाचे विहित नमुन्यातील उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करणे बंधनकारक आहे. सर्व संबंधित मदरशांकडून प्राप्त झालेल्या उपयोगिता प्रमाणपत्रांचा अहवाल संबंधित जिल्हाधिकारी यांनी शासनास तसेच महालेखापाल कार्यालयास सादर करावा. जिल्हाधिकारी यांनी नियंत्रण अधिकारी म्हणून शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.एयुडी-१०८२/सीआर-९०/८४/कोष-५, दि.२४ सप्टेंबर, १९८६ नुसार सदर निधीच्या खर्चाचा ताळमेळ घालून त्याचा अहवाल शासनास सादर करावा.

५. या योजनेंतर्गत उद्भवणाऱ्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील शासन निर्णय दि.११.१०.२०13 मध्ये नमूद उच्चस्तरीय निवड समितीस प्राधिकृत करण्यात येत आहे.

६. या योजनेंतर्गत होणारा खर्च "मागणी क्र.झेड ई-१, प्रधान लेखाशीर्ष २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२, समाजकल्याण २००, इतर कार्यक्रम, राज्य योजनांतर्गत योजना (०१) (३१) राज्यातील नोंदणीकृत मदरसांना पायाभूत सुविधा आणि विषय शिक्षकांच्या वेतनाकरिता सहायक अनुदान (२२३५ बी २२७) ३१ सहायक अनुदान" या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ या वर्षाकरिता मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

७. सदर शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-१ वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विअप्र-१०.०८/प्र.क्र.७०/२००८/विनियम दि.१५.०५.२००९, अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त झालेल्या अधिकारांतर्गत/विभागास वेळोवेळी वित्तीय अधिकार नियमपुस्तिका भाग-२ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे. या निधी वितरणासाठी शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.४.२०१७ मधील अटींची पूर्तता होत आहे. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक-अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक ६ फेब्रुवारी, २०१८ अन्वये या योजनेकरीता रू. ६.४० कोटी ( रू. सहा कोटी वाळीस लक्ष) निधी दिनांक मार्च, २०१८ पर्यंत खर्च करण्यास उपलब्ध आहे. या तरतुदीतून चालू आर्थिक वर्षासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार निधी वितरीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२७१७५८५०७३१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

. महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Samir Ramesh Salunkhe

Digitally signed by Samir Ramesh Salunkhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ba9951375d8539e02179fc093b36c7c7d7a866fc20f129ea0ff67bbde52fa539, cn=Samir Ramesh Salunkhe
Date: 2018.03.28 10:15:10 +05'30'

**( समीर साळुंखे )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
३. मा. मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. मा. विरोधी पक्षनेता, विधान सभा/ विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन,मुंबई.
५. मा. विधानसभा/ विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
६. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
७. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. सह सचिव/उप सचिव/ अवर सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
११. महालेखापा १/२ (लेखापरिक्षा), मुंबई/नागपूर
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती, जालना.
१३. जिल्हाधिकारी, अमरावती, जालना.
१४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती जालना.
१५. जिल्हा नियोजन अधिकारी, अमरावती, जालना.
१६. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती, जालना.
१७. अवर सचिव (अर्थसंकल्प शाखा), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. कक्ष अधिकारी, का.७, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१९. सर्व संबंधित मदरसा (जिल्हाधिकाऱ्यांमार्फत)
२०. निवडनस्ती.

## डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना, सन २०१७-१८

| अ.क्र. | मदरसांचे नावे | वितरीत करावयाचे अनुदान | | | एकूण | विदयार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पायाभूत सुविधा | ग्रंथालय | शिक्षकांचे मानधन | | |
| | अमरावती विभाग, जिल्हा- अमरावती. | | | | | |
| १. | अनमुगनी एज्युकेशन सोसायटी, वर्धा द्वारे संचालित अहेमदिया अरबी मदरसा ओकनाथ, ता. धामणगांव, जिल्हा-अमरावती | २००००० | ५०००० | १२०००० | ३७०००० | ७२ |
| २. | मोईज रहेमान बहुउद्देशिय संस्था, वर्धा द्वारे संचालित अली अरबी मदरसा सौदागर पुरा, ता. तिवसा, जिल्हा-अमरावती | २००००० | ५०००० | १८०००० | ४३०००० | १०४ |
| ३. | झोहा एज्युकेशन ॲन्ड वेलफेअर चॅरीटेबल ट्रस्ट, जि. अमरावती, द्वारे संचालित जामेआ बुस्ताने फातेमा लिलबनात मदरसा, जीमया नगर, लालखडी,रिंग रोड, अमरावती, जिल्हा-अमरावती | २००००० | ५००० | २२०००० | ४२५००० | २२३ |
| ४. | भारतोन्नती बहुउद्देशिय संस्था हाथीपुरा, वलगांव रोड, जि.अमरावती, द्वारे संचालित बिसमिल्ला बी मदरसा, हाथीपुरा, वलगांव रोड, अमरावती, जिल्हा-अमरावती | २००००० | ५०००० | २००००० | ४५०००० | ८६ |
| ५. | जामीया फैजे अबरार एज्युकेशन ॲन्ड वेलफेअर सोसायटी, अमरावती, द्वारे संचालित मदरसा जामिया ईस्लामिया फैजे अबरार, मु.पो.धामोरी, ता. भातकुली, जिल्हा-अमरावती | २००००० | ५००० | २२०००० | ४२५००० | १३० |
| ६. | श्री. साई अल्पसंख्यांक बहुउद्देशिय संस्था, वडनेर गंगाई, द्वारे संचालित उर्दु मदरसा, वडनेर गंगाई, ता. दर्यापुर, जिल्हा-अमरावती | २००००० | ५०००० | २२०००० | ४७०००० | ८३ |
| ७. | श्री. साई अल्पसंख्यांक बहुउद्देशिय संस्था, वडनेर गंगाई, द्वारे संचालित अंजुमन मदरसा तेलीपुरा, वडनेर गंगाई, ता. दर्यापुर, जिल्हा-अमरावती | २००००० | ५०००० | २२०००० | ४७०००० | ८५ |
| ८. | प्रज्ञा एज्युकेशन ॲन्ड सोशल वेलफेअर सोसायटी, धामणगांव गढी, ता. अचलपुर, जि. अमरावती, द्वारे संचालित जामिया मदरसा परतवाडा, ता. अचलपुर, जि. अमरावती. | २००००० | ५०००० | २००००० | ४५०००० | १०६ |
| ९. | हजरत इनायत खॉं गोहर एज्युकेशन ॲन्ड मल्टीपर्पज सोसायटी, जि. अमरावती, द्वारे संचालित हैदरी अरबी मदरसा, ढवळसरी, ता. नांदगांव खंडे, जिल्हा-अमरावती | २००००० | ५०००० | २००००० | ४५०००० | १४२ |
| १०. | मुस्लीम अल्पसंख्यांक बहुउद्देशिय संस्था, अचलपुर, द्वारे संचालित अनमता मदरसा, मंजुरपुरा, अचलपुर, जिल्हा-अमरावती | २००००० | ५०००० | १८०००० | ४३०००० | ११० |
| ११. | अन्सारी एज्युकेशन ॲन्ड सोशल वेलफेअर सोसायटी, अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती, द्वारे संचालित अलफलाह मदरसा, मोमिनपुरा, अंजनगांव सुर्जी, जिल्हा-अमरावती. | २००००० | ५०००० | २००००० | ४५०००० | १२० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १२. | सबा एज्युकेशन अँन्ड वेलफेअर मल्टी पर्पज सोसायटी, ता. अचलपुर, जि. अमरावती, द्वारे संचालित नुर मदरसा बेगमपुरा, अचलपुर, ता. अचलपुर, जिल्हा-अमरावती. | २००००० | ५०००० | १२०००० | ३७०००० | १२६ |
| १३. | फजलीया वेलफेअर सोसायटी, दुलागेट, अचलपुर, जि. अमरावती, द्वारे संचालित फजलीया मदरसा, दुलागेट, अचलपुर, जिल्हा-अमरावती. | २००००० | ५०००० | २००००० | ४५०००० | ११० |
| | **एकूण रूपये** | २,६०,०००० | ५६०००० | २४२०००० | ५६४०००० | |
| | | | | | | |
| | **औरंगाबाद विभाग, जिल्हा-जालना.** | | | | | |
| १. | फरोगे उर्दु अखलती खवातीने हिंद अमानउल्ला वाचनालय,जालना,ता.जि.जालना. द्वारे संचालित डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम मॉडर्न अरबी दिन मक्तब जालना, ता.जि. जालना. | २००००० | ५०००० | २२०००० | ४७०००० | ३७६ |
| | **एकूण रू.** | २००००० | ५०००० | २२०००० | ४७०००० | |
| | | | | | | |